दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

■ आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. ३१ मे, २०२६ | ■ वर्ष - १ ■ अंक - २४५ ■ पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

रविवार दि. ३१ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, पौर्णिमा दुपारी २-१५ पर्यंत नंतर प्रतिपदा तिथी, दिवस नक्षत्र- अनुराधा संध्याकाळी ४-१२ पर्यंत नंतर ज्येष्ठा, चंद्र रास- वृश्चिक, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

### लिंबाच्या दरात तेजी

**पुणे** : राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये आज विविध फळे आणि भाजीपाला पिकांच्या बाजारभावात मिश्र चित्र पाहायला मिळाले. कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने दरांवर दबाव कायम राहिला. लिंबू आणि आंब्याच्या बाजारात तेजी दिसून आली.विविध बाजार समित्यांमध्ये आज एकूण १ हजार ४७६ क्विंटल लिंबाची आवक नोंदविण्यात आली. मुंबई बाजारात सर्वाधिक ७७० क्विंटल लिंबू दाखल झाले. लिंबाला प्रतिक्विंटल ४ हजार ते ६ हजार रुपयांपर्यंत दर मिळाला.

## सारांश वृत्त

### कूलर फॅक्टरीला भीषण आग

**नवी दिल्ली** : दिल्लीच्या बाहेरील बवाना औद्योगिक क्षेत्रातील कूलर उत्पादक युनिटमध्ये लागलेल्या आगीत नऊ कामगारांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही, असेही त्यांनी सांगितले. दिल्ली राज्य औद्योगिक आणि पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या सेक्टर-५ मधील एका कारखान्याला आग लागल्याची माहिती दिल्ली अग्निशमन सेवेने पहाटे प्राप्त झाली.

### इंधन दरवाढीवरून काँग्रेसचे आंदोलन

**लुधियाना** : इंधनाच्या दरवाढीच्या मुद्द्यावरून पंजाब कॉंग्रेसचे नेते आणि कार्यकर्त्यांनी शनिवारी केंद्राविरोधात राज्यव्यापी निदर्शने केली आणि सांगितले की या दरवाढीमुळे सर्वसामान्यांवर वाईट परिणाम झाला आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीला विरोध दर्शविण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी बैलगाड्या आणि सायकलींवर निषेध मोर्चा काढला. 'इंधन दरवाढ मागे घ्या' असे फलक हातात घेऊन आंदोलकांनी सांगितले की, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्याने सामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक बोजा पडला आहे.

### मुख्याध्यापकांचे निलंबन मागे घेण्याचे निर्देश

**तिरुवनंतपुरम** : केरळचे मुख्यमंत्री सतीसन यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले की, सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी सरकारी शाळेच्या मुख्याध्यापकांचे निलंबन मागे घ्यावे. अट्टिंगल येथील शासकीय मॉडेल बॉईज उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. जावद यांनी मुख्यमंत्र्यांविरोधात अपमानास्पद मजकूर पोस्ट केल्याच्या आरोपाखाली निलंबित करण्यात आले होते.

### ममता बॅनर्जी उपस्थित राहण्याची शक्यता

# इंडिया आघाडीच्या बैठकीकडे देशाचे लक्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : आगामी ६ जून रोजी होणाऱ्या इंडिया आघाडीच्या महत्त्वपूर्ण बैठकीकडे देशाच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून, पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी या बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नुकतीच ममता बॅनर्जी यांच्याशी अर्ध्या तासाहून अधिक काळ चर्चा केल्यानंतर या शक्यतेला अधिक बळ मिळाले आहे.





लोकसभा निवडणुकीनंतर विरोधी पक्षांच्या आघाडीसमोर निर्माण झालेल्या नव्या राजकीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. अनेक राज्यांतील निवडणूक निकालांमुळे विरोधी पक्षांच्या रणनीतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आघाडीतील प्रमुख घटक पक्षांच्या भविष्यातील भूमिकेबाबतही चर्चा सुरू आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, ६ जूनची बैठक केवळ भाजपविरोधी रणनीती ठरविण्यापुरती मर्यादित राहणार नाही. बदलत्या राजकीय परिस्थितीत आघाडीतील पक्षांचे अस्तित्व, त्यांची राजकीय प्रासंगिकता आणि आगामी निवडणुकांसाठीची दिशा यावरही सखोल चर्चा होण्याची शक्यता आहे. विशेषतः ममता बॅनर्जी यांच्या संभाव्य उपस्थितीमुळे बैठकीचे राजकीय महत्त्व अधिक वाढले आहे. विरोधी आघाडीतील विविध पक्षांमध्ये अलीकडील काळात निर्माण झालेल्या मतभेदांचाही या बैठकीत आढावा घेतला जाणार असल्याचे सांगितले जात आहे. तामिळनाडूमधील राजकीय समीकरणे, काँग्रेस आणि द्रमुक यांच्यातील संबंध तसेच अन्य प्रादेशिक पक्षांची भूमिका यावरही चर्चा अपेक्षित आहे. काही अहवालांनुसार निवडणुकीनंतर काँग्रेस आणि द्रमुक यांच्यातील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाल्याची चर्चा सुरू असून त्याचे पडसाद आघाडीच्या बैठकीत उमटण्याची शक्यता आहे. केरळमधील राजकीय घडामोडी आणि डाव्या पक्षांची भूमिका याकडेही राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष भविष्यात इंडिया आघाडीत किती सक्रिय राहणार, याबाबतही या बैठकीत चर्चा होऊ शकते. राहुल गांधी यांच्यासाठीही ही बैठक महत्त्वाची ठरणार आहे. विरोधी पक्षांना एकत्र ठेवणे, आघाडीतील मतभेद दूर करणे आणि भाजपविरोधी राजकारणाला नवी दिशा देणे, या दृष्टीने त्यांच्या नेतृत्वाची कसोटी लागणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. ममता बॅनर्जी यांची उपस्थिती निश्चित झाल्यास इंडिया आघाडीला नवसंजीवनी मिळू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. देशातील बदलत्या राजकीय परिस्थितीत विरोधी पक्षांची एकजूट कितपत टिकून राहते आणि आगामी काळातील त्यांची रणनीती काय असते, याचे संकेत या बैठकीतून मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही बैठक अत्यंत निर्णायक मानली जात आहे.

# गणवेश वाटपात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी गणवेश उपलब्ध व्हावा यासाठी शालेय शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. यंदापासून इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शाळा सुरू होताच गणवेशाचे वाटप करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

दरवर्षी शाळा सुरू झाल्यानंतरही अनेक विद्यार्थ्यांना गणवेश मिळण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या. तसेच काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचे कापड वापरले जात असल्याचेही निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर शासनाने नवीन मार्गदर्शक सूचना जारी करून गणवेश वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि दर्जेदार करण्याचा निर्णय घेतला आहे.

निर्देशानुसार शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश मिळणे आवश्यक आहे. यासाठी शाळा व्यवस्थापन समित्यांवर थेट जबाबदारी सोपविण्यात आली आहे. गणवेशावर समग्र शिक्षा अभियानाचा लोगो असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

गणवेशाच्या रंगसंगतीबाबतही स्पष्ट नियम निश्चित करण्यात आले आहेत. मुलांसाठी आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाची अर्धी पँट, तर मुलींसाठी आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाचा स्कर्ट अथवा पिनो फ्रॉक निश्चित करण्यात आला आहे. ज्या शाळांमध्ये सलवार-कमीज गणवेश आहे, तेथे गडद निळ्या रंगाची सलवार आणि आकाशी रंगाची कमीज असणार आहे.

# भिवंडीतून ५,९२९ किलो मिथेनॉल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील फुगेवाडी, दापोडी आणि हडपसर येथे विषारी गावठी दारूच्या सेवनामुळे १७ जणांचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई केली आहे. भिवंडी येथील मेसर्स रेक्स इंटरनॅशनल या कंपनीवर धाड टाकून तब्बल ५,९२९ किलो मिथेनॉलचा साठा जप्त करण्यात आला आहे. विषारी दारूमध्ये वापरण्यात आलेले मिथेनॉल याच कंपनीकडून पुरविण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर मिथेनॉलच्या अवैध साठ्यांविरोधात विशेष मोहीम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा आस्थापनाला कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

माहितीनुसार, फुगेवाडी परिसरात मृत्यू झालेल्या व्यक्तींनी कर्नालसिंग विरका यांच्या ठिकाणी हातभट्टीची दारू सेवन केली होती. विरका याला ही दारू योगेश वानखेडे याच्याकडून मिळाली होती. योगेश वानखेडे हा उरळी कांचन येथील राजू प्रजापती याच्याकडून दारू घेऊन पुरवठा करत असल्याचे उघड झाले. दारूमध्ये वापरण्यात आलेले मिथेनॉल रेक्स इंटरनॅशनलकडून पुरविण्यात आल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे.

### आयएसआय आणि कुख्यात डी-कंपनीशी संबंधित ९ जण अटकेत

# दहशतवादी हल्ल्याचा मोठा कट उधळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : देशाची आर्थिक राजधानी मुंबई आणि राजधानी दिल्ली येथे २६/११ प्रमाणे मोठा दहशतवादी हल्ला घडवून आणण्याचा कट दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने उधळून लावला आहे. या प्रकरणात पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या डी-कंपनीशी कथित संबंध असलेल्या नऊ संशयितांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे देशातील सुरक्षा यंत्रणांना मोठे यश मिळाले असून संभाव्य भीषण हल्ला टळल्याचे मानले जात आहे.



तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेले संशयित केवळ पाकिस्तानमधून मिळणाऱ्या सूचनांवर काम करत नव्हते, तर त्यांना दाऊद इब्राहिमच्या गुन्हेगारी जाळ्याचाही पाठिंबा मिळत होता. या मॉड्यूलमध्ये दिल्ली, मुंबई आणि पंजाबमधील काही स्थानिक गुन्हेगारांचा समावेश असल्याचे समोर आले असून काही परदेशी नागरिकांचाही सहभाग असल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे.

सुरक्षा यंत्रणांच्या प्राथमिक तपासात या टोळीने मुंबई आणि दिल्लीतील अतिसंवेदनशील ठिकाणांची रेकी केल्याचे उघड झाले आहे. रेल्वे स्थानके, विमानतळ, वीज प्रकल्प, महत्त्वाच्या सरकारी इमारती तसेच मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असलेली ठिकाणे त्यांच्या लक्ष्यावर होती. मुंबईतील गर्दीच्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर जीवितहानी घडवून आणण्याचा कट रचण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

तपास यंत्रणांच्या मते, आत्मघातकी हल्ले तसेच वाहनांमध्ये आयईडी स्फोटके ठेवून साखळी स्फोट घडवून आणण्याची योजना तयार करण्यात आली होती. या हल्ल्यांद्वारे देशात भीतीचे वातावरण निर्माण करणे आणि सुरक्षा व्यवस्थेला मोठे आव्हान उभे करणे हा त्यामागील उद्देश असल्याचे मानले जात आहे.

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने केलेल्या कारवाईदरम्यान संशयितांकडून मोठ्या प्रमाणात अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, हँड ग्रेनेड्स, दारुगोळा आणि स्फोटक साहित्य जप्त करण्यात आले आहे. हे साहित्य पाकिस्तानमधून विविध मार्गांनी भारतात पोहोचवण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. तसेच या मॉड्यूलला आर्थिक मदत कोणत्या माध्यमातून मिळत होती, याचाही तपास सुरू आहे.

या कारवाईनंतर केंद्र सरकार आणि सुरक्षा यंत्रणांनी देशभरात हाय अलर्ट जारी केला आहे. मुंबई, दिल्लीसह प्रमुख महानगरांतील रेल्वे स्थानके, विमानतळ, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा वाढवण्यात आली आहे. संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त पोलीस आणि निमलष्करी दल तैनात करण्यात आले आहेत. सुरक्षा यंत्रणांच्या मते, भारतातील गुन्हेगारी नेटवर्क आणि परदेशी दहशतवादी संघटनांच्या संगनमतातून देशात अस्थिरता निर्माण करण्याचा हा गंभीर प्रयत्न होता. मात्र, वेळेत मिळालेल्या गुप्त माहितीद्वारे आणि दिल्ली पोलिसांच्या धाडसी कारवाईमुळे हा कट उधळण्यात यश आले आहे.

### पुण्यातील विषारी दारू प्रकरणात

# उत्पादन शुल्कचे १३ अधिकारी-कर्मचारी निलंबित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : हडपसर, फुगेवाडी आणि दापोडी परिसरात विषारी गावठी दारूच्या सेवनामुळे १७ जणांचा मृत्यू झाल्याच्या धक्कादायक घटनेनंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी प्रशासकीय कारवाई केली आहे. या प्रकरणात कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत विभागातील १३ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे उत्पादन शुल्क विभागात खळबळ उडाली आहे.

दरम्यान, पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी विषारी दारू प्रकरणात अवैध धंद्यावर कारवाई करण्यास दिरंगाई केल्याचा ठपका ठेऊन हडपसर पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले, सहायक निरीक्षक हसीना शिकलगार,, उपनिरीक्षक हसन मुलाणी यांना निलंबित करण्याचे आदेश दिले.

निलंबित करण्यात आलेल्यांमध्ये तीन निरीक्षक, सहा उपनिरीक्षक आणि चार शिपायांचा समावेश असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक अतुल कानडे यांनी दिली. या प्रकरणात आतापर्यंत तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून विषारी दारूचा संपूर्ण साठा जप्त करण्यात आला आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी राधेश्याम प्रजापती हा पंधरस्थ परिसरात अवैध दारू निर्मितीचा व्यवसाय चालवत होता. तर मुख्य आरोपी योगेश वानखेडे हा तयार करण्यात आलेली दारू विविध भागात पोहोचवण्याचे काम करत होता. अधिक नफा कमावण्याच्या उद्देशाने दारूमध्ये मिथेनॉल या घातक रसायनाची भेसळ करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

अधीक्षक अतुल कानडे यांनी सांगितले की, दारू तयार करण्याच्या प्रक्रियेदरम्यान मिथेनॉलचे प्रमाण चुकीच्या पद्धतीने मिसळले गेले. त्यामुळे दारू अत्यंत विषारी बनली आणि तिच्या सेवनामुळे अनेकांना जीव गमवावा लागला. ही घटना निष्काळजीपणा आणि बेकायदेशीर व्यवसायाचे गंभीर उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.

या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला असून काही जणांवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. त्यापैकी पाच जणांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे पुणे शहरासह संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे.

### व्हिएतनाम खरेदी करणार ब्रह्मोस

**नवी दिल्ली** : भारताने विकसित केलेल्या शस्त्रांची निर्यात भारत वाढवत असल्याचं दिसून येत आहे. आता व्हिएतनाम भारताकडून ब्राह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करणार आहे. भारताकडून व्हिएतनाम ब्रह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करण्याच्या करारावर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. दरम्यान, भारत आणि रशियाच्या संयुक्त उपक्रमाच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या ब्रह्मोस खरेदी करण्यासाठी व्हिएतनामने भारताबरोबर करार केल्याचं शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. इंडोनेशियाबरोबर ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या कराराबाबतच्या चर्चा अंतिम टप्प्यात आली आहे.

# टीएमसी-भाजपमध्ये आरोप-प्रत्यारोप

### अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ल्याचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सोनारपूर** : पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील सोनारपूर येथे तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस व खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवडणुकीनंतरच्या हिंसाचारात जखमी झालेल्या पक्ष कार्यकर्त्यांची भेट घेण्यासाठी ते सोनारपूर येथे गेले असताना ही घटना घडल्याचे टीएमसीकडून सांगण्यात आले.

अभिषेक बॅनर्जी घटनास्थळी पोहोचल्यानंतर काही आंदोलकांनी त्यांना घेराव घालत जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर झालेल्या गोंधळात धक्काबुक्की झाल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसने केला आहे. काही जणांनी त्यांच्यावर अंडी फेकल्याचाही दावा पक्षाकडून करण्यात आला आहे. या गोंधळात बॅनर्जी यांचा शर्ट फाटल्याचेही सांगण्यात आले.

परिस्थिती तणावपूर्ण बनल्यानंतर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी अभिषेक बॅनर्जी यांना हेल्मेट घालून तेथून सुरक्षित बाहेर काढले. घटनेनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी हल्ल्याचा आरोप करत तीव्र नाराजी व्यक्त केली. "माझ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. माझा शर्ट फाडण्यात आला. घटनास्थळी पुरेशा प्रमाणात पोलिस बंदोबस्त नव्हता. हेल्मेट असल्यामुळे माझ्या डोक्याचे संरक्षण झाले. अशा प्रकारच्या हल्ल्यांना आम्ही घाबरणार नाही," असे बॅनर्जी यांनी सांगितले.

पश्चिम बंगाल सीआयडीने बनावट स्वाक्षरी प्रकरणात अभिषेक बॅनर्जी यांना समन्स बजावले आहेत. त्यांना सोमवारी दुपारी १२ वाजता चौकशीसाठी सीआयडी मुख्यालयात हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. अधिकाऱ्यांनी त्यांच्या कालीघाट येथील निवासस्थानी जाऊन ही नोटीस बजावली आहे.


### मोक्कासारख्या कठोर कायद्यांतर्गत कारवाई करण्याचा इशारा

# कांदा खरेदीत काळाबाजार खपवून घेतला जाणार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरपूर** : कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने कांद्याला किमान १,५८५ रुपये प्रतिक्विंटल दर निश्चित केला असून, खरेदी प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा काळाबाजार होऊ नये यासाठी कठोर उपाययोजना करण्यात येत आहेत. खरेदी केंद्रांवर 'इन-कॅमेरा' पद्धतीने कांदा खरेदी केली जाणार असून गैरव्यवहार करणाऱ्यांवर मोक्कासारख्या कठोर कायद्यांतर्गत कारवाई करण्याचा इशारा राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिला.

शिरपूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना रावल यांनी कांदा बाजारपेठेतील परिस्थिती, निर्यात धोरण आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारने हाती घेतलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, कांदा प्रश्नासंदर्भात दिल्ली येथे केंद्र सरकारच्या मंत्र्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक झाली असून, कांदा उत्पादकांना योग्य भाव मिळावा यासाठी विविध निर्णय घेण्यात आले आहेत.



रावल म्हणाले की, पूर्वी कांद्याचे उत्पादन मुख्यत्वे महाराष्ट्रात होत होते. मात्र आता देशातील अनेक राज्यांनी कांदा उत्पादनाला प्राधान्य दिल्याने स्पर्धा वाढली आहे. याशिवाय बांगलादेश आणि श्रीलंका यांसारख्या देशांमध्येही कांद्याचे उत्पादन वाढल्याने भारतीय कांद्याच्या निर्यातीवर परिणाम झाला आहे.

या पार्श्वभूमीवर कांदा निर्यात वाढविण्यासाठी केंद्र सरकारकडून मिळणारी अनुदानाची रक्कम दुप्पट करण्यास मान्यता मिळाली आहे.

राज्य सरकारने दोन लाख टन कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला असून, ही खरेदी कृषी उत्पन्न बाजार समित्या तसेच नाफेड आणि एनसीसीएफमार्फत केली जाणार आहे. या खरेदी प्रक्रियेत शेतकऱ्यांना किमान १,५८५ रुपये दर मिळेल याची हमी देण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात कांद्याच्या बाजारभावात सकारात्मक सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

कांदा खरेदीदरम्यान काही व्यापारी किंवा मध्यस्थ कृत्रिमरित्या भाव नियंत्रणात ठेवण्याचा किंवा काळाबाजार करण्याचा प्रयत्न करीत असल्याची माहिती सरकारच्या निदर्शनास आली आहे.

या पार्श्वभूमीवर नाशिकचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व खरेदी केंद्रांवर सीसीटीव्ही आणि इतर तांत्रिक साधनांच्या मदतीने खरेदी प्रक्रियेवर बारकाईने नजर ठेवली जाणार आहे.

"शेतकऱ्यांच्या हक्काचा भाव हिरावून घेणाऱ्यांना सरकार कोणतीही सवलत देणार नाही. कांदा खरेदी प्रक्रियेत गैरव्यवहार करणारे, साठेबाजी किंवा काळाबाजार करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल. आवश्यक असल्यास मोक्कासारख्या गंभीर कायद्यांचाही वापर करण्यात येईल," असा स्पष्ट इशारा जयकुमार रावल यांनी दिला.

सरकारच्या या भूमिकेमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये दिलासाचे वातावरण निर्माण झाले असून, पारदर्शक खरेदी प्रक्रियेमुळे बाजारात स्थिरता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विषारी दारूकांडावरून काँग्रेसचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**मुंबई** : पुण्यातील विषारी दारूकांडावरून काँग्रेसने राज्य सरकार आणि गृह विभागावर जोरदार हल्लाबोल केला आहे. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून अवैध धंदे, ड्रग्ज तस्करी आणि हातभट्ट्यांच्या जाळ्याला सत्ताधाऱ्यांचे संरक्षण मिळत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. तसेच राज्याला पूर्णवेळ आणि सक्षम गृहमंत्री देण्याची मागणीही त्यांनी केली.

शनिवारी मुंबईतील टिळक भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ यांनी पुण्यातील विषारी दारू प्रकरणाचा संदर्भ देत गृह विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्यात खालच्या स्तरापासून मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यापर्यंत हप्ते पोहोचत असल्याने पोलिस यंत्रणेवर कोणाचाही वचक उरलेला नाही, असा आरोप त्यांनी केला.

पुण्यात विषारी दारूच्या सेवनामुळे २२ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याचे सांगत सपकाळ म्हणाले की, या दुर्घटनेनंतर सरकारला जाग आली असून आता हातभट्ट्या उद्ध्वस्त करण्याचे आणि अवैध धंद्यांवर कारवाईचे नाटक सुरू आहे. मात्र या हातभट्ट्या एका रात्रीत उभ्या राहिलेल्या नाहीत. त्या अनेक वर्षांपासून राजरोसपणे सुरू होत्या. प्रशासनाने वेळेत कारवाई केली असती तर इतके बळी गेले नसते, असे त्यांनी म्हटले. सरकार आता प्रतिमाबचावासाठी कारवाई करत असल्याची टीकाही त्यांनी केली.

## संपादकीय

# भागीदारीपलीकडील हितसंबंधांचे वास्तव



**जागतिक राजकारणात कायमस्वरूपी मित्र नसतात, तर कायमस्वरूपी हितसंबंध असतात, असे म्हटले जाते. भारत-अमेरिका संबंधांचा प्रवासही याच वास्तवाची साक्ष देतो. वाढते संरक्षण सहकार्य, व्यापार आणि सामरिक भागीदारी यामागे मूल्यांइतकेच परस्पर हितसंबंधही कार्यरत असल्याचे आज स्पष्टपणे दिसत आहे.**

शीतयुद्धाच्या काळात परस्परांपासून दूर असलेले भारत आणि अमेरिका आज जागतिक राजकारणातील महत्त्वाचे भागीदार बनले आहेत. एकेकाळी अमेरिकन मुत्सद्दी डेनिस कक्स यांनी या संबंधांना दुरावलेल्या लोकशाह्यांचे नाते असे संबोधले होते. भारताची निर्गुट चळवळीतील भूमिका आणि अमेरिकेचे पाकिस्तानकडे झुकलेले धोरण यामुळे दोन्ही देशांमध्ये दीर्घकाळ विश्वासाचे वातावरण निर्माण होऊ शकले नव्हते. मात्र, २००५ च्या भारत-अमेरिका अणुकराराने या संबंधांना नवे वळण दिले. त्यानंतर संरक्षण, तंत्रज्ञान, ऊर्जा, व्यापार आणि सामरिक सहकार्याची नवी दालने खुली झाली. काळाच्या ओघात भारत-अमेरिका संबंधांना एकविसाव्या शतकातील सर्वात महत्त्वाची भागीदारी असेही संबोधले जाऊ लागले. मात्र, या संबंधांचे मूल्यमापन केवळ मैत्री किंवा लोकशाही मूल्यांच्या आधारे करता येत नाही. मूल्याधारित जागतिक नेतृत्वापेक्षा अमेरिकेने स्वतःच्या आर्थिक आणि सामरिक हितसंबंधांना प्राधान्य दिले. व्यापार, संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रातील निर्णयांमध्ये मित्रदेशांनाही विशेष सवलत मिळणार नाही, असा संदेश वॉशिंग्टनने दिला. त्यामुळे भारतासोबतच्या संबंधांनाही अधिक वास्तववादी चौकट प्राप्त झाली. भारत-अमेरिका अणुकरारालाही अनेकदा धोरणात्मक मैत्रीचे प्रतीक मानले जाते. परंतु त्यामागेही दोन्ही देशांचे स्पष्ट हितसंबंध कार्यरत होते. भारताला जागतिक अणुऊर्जा व्यवस्थेत प्रवेश आणि ऊर्जा सुरक्षेची नवी संधी मिळाली, तर अमेरिकेला संरक्षण, तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीसाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध झाली. म्हणजेच सामरिक भागीदारीच्या पायावरही व्यवहाराचे वास्तव उभे होते. व्यापारातील शुल्कवाढ, बाजारपेठेतील प्रवेशाचे प्रश्न, रशियाकडून भारताची तेल खरेदी आणि एस-४०० क्षेपणास्त्र प्रणालीच्या खरेदीवरून अमेरिकेने वेळोवेळी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र भारताने राष्ट्रीय हिताला प्राधान्य देत स्वतंत्र भूमिका कायम ठेवली. रशिया-युक्रेन युद्धाच्या काळातही भारताने अमेरिकेच्या अपेक्षांनुसार भूमिका न घेता स्वतःच्या ऊर्जा आणि सामरिक गरजांच्या आधारे निर्णय घेतले. याच काळात भारताने अमेरिकेसोबतचे सहकार्यही वाढवले. क्वाडमधील सहभाग, इंडो-पॅसिफिकमधील सहकार्य, अत्याधुनिक तंत्रज्ञान हस्तांतरण, संरक्षण उत्पादन आणि पुरवठा साखळीतील भागीदारी यामुळे दोन्ही देश अधिक जवळ आले. चीनच्या वाढत्या आक्रमकतेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेसाठी भारत हा आशियातील महत्त्वाचा भागीदार बनला, तर भारतासाठी अमेरिकेचे तंत्रज्ञान आणि गुंतवणूक महत्त्वाची ठरली. अमेरिकेशी जवळीकीबरोबरच भारताने रशिया, फ्रान्स, जपान, पश्चिम आशियातील देश आणि ग्लोबल साऊथमधील राष्ट्रांशीही संबंध अधिक दृढ केले आहेत. हीच भारताच्या बहुआयामी परराष्ट्र धोरणाची ताकद आहे. एका बाजूला भारत क्वाडमध्ये सक्रिय आहे, तर दुसऱ्या बाजूला ब्रिक्स आणि शांघाय सहकार्य संघटनेतही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ऑपरेशन सिंदूरनंतरच्या घडामोडींनीही भारताच्या स्वायत्त परराष्ट्र दृष्टिकोनाची झलक दाखवली. दहशतवादाविरोधातील कारवाई असो किंवा राष्ट्रीय सुरक्षेचे प्रश्न, भारताने आंतरराष्ट्रीय दबावापेक्षा स्वतःच्या राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले. अमेरिकेसह सर्व प्रमुख शक्तींशी संवाद ठेवत स्वतंत्र निर्णय घेण्याची क्षमता भारताने जपली आहे. आज भारत आणि अमेरिका अनेक क्षेत्रांत सहकार्य करत असले, तरी दोन्ही देशांचे हितसंबंध प्रत्येक मुद्द्यावर एकसारखे असतीलच असे नाही. चीन, पाकिस्तान, ऊर्जा सुरक्षा, व्यापार, हवामान बदल किंवा जागतिक संघर्षांबाबत मतभेद कायम राहू शकतात. आज भारत हा कोणत्याही एका गटाचा भागीदार नसून जागतिक घडामोडींमध्ये स्वतंत्र प्रभाव असलेली शक्ती म्हणून उदयास येत आहे. भारत-अमेरिका संबंधांचे भवितव्य भावनिक मैत्रीपेक्षा परस्पर हितसंबंधांवर अधिक अवलंबून राहणार आहे. आजच्या बहुध्रुवीय जगात भारताची खरी ताकद कोणत्याही एका गटाशी बांधील न राहता सर्वांसोबत संवाद ठेवण्यात आहे. त्यामुळे भारत-अमेरिका संबंधांचा खरा पाया विश्वासापेक्षा हितसंबंधांवर आणि हितसंबंधांपेक्षा भारताच्या राष्ट्रीय प्राधान्यांवर उभा राहिला पाहिजे.

# ऊर्जा सुरक्षेचे आव्हान आणि वास्तवाचे भान



**» आखाती देशांमधील तणाव आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतील पेचप्रसंगामुळे ऊर्जा बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. या संकटात चीनच्या तुलनेत भारताची स्थिती अत्यंत नाजूक असून, धोरणात्मक पावले उचलणे आवश्यक आहे.**

जागतिक राजकारणात आणि अर्थकारणात खनिज तेलाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मध्यपूर्वेत सध्या उफाळून आलेला संघर्ष आणि इस्रायल व इराण यांच्यातील वाढता तणाव यामुळे संपूर्ण जगाचे लक्ष होर्मुझच्या सामुद्रधुनीकडे वेधले गेले आहे. इराणने हा अत्यंत महत्त्वाचा सागरी मार्ग रोखून धरण्याचा इशारा दिला आहे. जगातील एकूण खनिज तेलाच्या पुरवठ्यापैकी तब्बल वीस टक्के तेल याच अरुंद सागरी मार्गातून वाहून नेले जाते. त्यामुळे जर हा मार्ग खरोखरच बंद झाला किंवा तेथील वाहतुकीत अडथळे निर्माण झाले, तर संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेला एक प्रचंड मोठा धक्का बसेल. या संभाव्य संकटाची सर्वाधिक झळ भारतासारख्या विकसनशील आणि ऊर्जेसाठी पूर्णपणे परकीय आयातीवर अवलंबून असलेल्या देशाला बसणार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे भाव गगनाला भिडले असून, आता पुढे काय वाढून ठेवले आहे, या चिंतेने भारतीय अर्थव्यवस्थेच्या गोटात मोठी अस्वस्थता निर्माण केली आहे.

भारताच्या ऊर्जा सुरक्षेचा विचार केल्यास परिस्थिती अत्यंत चिंताजनक दिसते. भारत आपल्या एकूण गरजेच्या तब्बल पंच्याऐंशी टक्के कच्चे तेल परदेशातून आयात करतो. यापैकी बहुतांश आयात ही आखाती देशांमधून आणि विशेषतः होर्मुझच्या सामुद्रधुनीतूनच होते. सौदी अरेबिया, इराक आणि संयुक्त अरब अमिराती यांसारख्या देशांकडून येणारे तेल याच मार्गाने भारताच्या किनाऱ्यावर पोहोचते. त्यामुळे या मार्गावरील कोणताही अडथळा भारताच्या ऊर्जा सुरक्षेची थेट कोंडी करणारा ठरतो. इंधनाचा अखंडित पुरवठा हा कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा मुख्य कणा असतो. इंधनाविना उद्योगधंदे, मालवाहतूक आणि सार्वजनिक जनजीवन पूर्णपणे ठप्प होऊ शकते. त्यामुळे आखाती देशांमधील अस्थिरता भारतासाठी निव्वळ एक आंतरराष्ट्रीय बातमी नसून, ती आपल्या देशांतर्गत अर्थव्यवस्थेसाठी वाजलेली धोक्याची घंटा आहे. आजघडीला आपण ऊर्जेच्या बाबतीत किती परावलंबी आहोत, हेच या संकटाने पुन्हा एकदा नव्याने अधोरेखित केले आहे.

चीन हादेखील जगातील सर्वात मोठा तेल आयातदार देश आहे; परंतु चीनने संभाव्य संकटे ओळखून स्वतःची ऊर्जा सुरक्षा अत्यंत भक्कम केली आहे. गेल्या काही वर्षांत चीनने रशियाकडून जमिनीवरून येणाऱ्या पाईपलाईनद्वारे तेल आयात वाढवली आहे, ज्यामुळे त्यांना सागरी मार्गांवर पूर्णपणे अवलंबून राहावे लागत नाही. चीनने 'बेल्ट अँड रोड' प्रकल्पाच्या माध्यमातून आफ्रिका आणि मध्य आशियातील अनेक देशांमध्ये तेलाच्या विहिरी आणि पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. यामुळे त्यांच्या तेल पुरवठ्यात कमालीचे वैविध्य आले आहे. याउलट, भारताची रशियाकडून होणारी तेल आयातही प्रामुख्याने समुद्रामार्गेच होते.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतील संकटाचा थेट परिणाम भारताच्या सर्वसामान्य नागरिकांवर आणि अर्थव्यवस्थेवर होणार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढले की भारताचे आयात बिल अवाढव्य वाढते. यामुळे देशाची परकीय चलनाची गंगाजळी वेगाने आटते आणि रुपयाचे मूल्य डॉलरच्या तुलनेत आणखी घसरते. रुपया घसरल्यामुळे इतर सर्व प्रकारची आयात महाग होते, ज्यामुळे देशात महागाईचा भडका उडतो. पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढले की मालवाहतूक महागते आणि साहजिकच जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडतात. अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांसोबत एकाच वेळी संतुलित संबंध टिकवून ठेवणे भारतीय मुत्सद्देगिरीसाठी मोठे आणि खडतर आव्हान ठरणार आहे.

मध्यपूर्वेतील सध्याचा तणाव भारतासाठी एक मोठा धडा आहे. निव्वळ आखाती देशांवर अवलंबून राहण्याची सवय भारताला आता मोडावी लागेल. भारताने आपला आपत्कालीन तेलसाठा युद्धपातळीवर वाढवणे ही काळाची सर्वांत मोठी गरज बनली आहे. तसेच, भारताला रशियाकडून होणाऱ्या तेल आयातीचे मार्ग अधिक सुरक्षित करावे लागतील. अपारंपरिक ऊर्जास्रोतांकडे भारताने आता अधिक वेगाने वाटचाल केली पाहिजे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर आणि देशांतर्गत ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन दिल्यास आपले हे परकीय अवलंबित्व काही अंशी तरी नक्कीच कमी होईल. जागतिक राजकारणात कधीही काहीही घडू शकते, हे गृहीत धरूनच भारताला आपले ऊर्जा धोरण आखावे लागेल. अन्यथा, परक्यांच्या युद्धाची सर्वात मोठी आर्थिक किंमत भारताला स्वतःच्या खिशातून चुकवावी लागेल, हे अटळ सत्य आहे. या दिशेने टाकलेले प्रत्येक पाऊल भारताला खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण आणि सुरक्षित बनवेल.

# पिंपरीत पवना नदीची मृत होण्याकडे भीषण वाटचाल

## अतिक्रमण, कचरा आणि रासायनिक प्रदूषणाने नदीचे अस्तित्व धोक्यात

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** विकासाच्या गगनचुंबी दाव्यांमुळे देशभरात ओळख निर्माण करणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहराची जीवनवाहिनी असलेली पवना नदी मात्र दिवसेंदिवस मृतप्राय होत चालल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. रावेत, किवळे, चिंचवड, थेरगाव, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, सांगवी, कासारवाडी ते दापोडीपर्यंतच्या नदीकाठावर अतिक्रमण, राडारोडा, घनकचरा आणि रासायनिक सांडपाण्याचा विळखा पडल्याने नदीचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.

प्रत्यक्ष पाहणीत नदीपात्र आणि नदीकाठ अनेक ठिकाणी कचऱ्याच्या ढिगाऱ्यांनी व्यापल्याचे दिसून आले. पवना नदी दापोडीजवळ मुळा नदीला मिळते. मात्र या संपूर्ण पट्ट्यात नदीचे नैसर्गिक सौंदर्य जवळपास नाहीसे झाले असून अनेक ठिकाणी दुर्गंधी, अस्वच्छता आणि प्रदूषणाचे साम्राज्य पसरले आहे. नदीकाठावर फिरणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीमुळे थांबणेही कठीण होत असल्याचे चित्र आहे.

नदीपात्रात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, थर्माकोल, कपडे, झाडांचा कचरा, बांधकामातील टाकाऊ साहित्य आणि इतर घनकचरा टाकण्यात आल्याचे दिसून आले. काही भागांत तर नदीच्या प्रवाहावरच कचऱ्याचे थर साचले आहेत. या कचऱ्यामुळे पाण्याचा प्रवाह बाधित होत असून पर्यावरणालाही गंभीर धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी डासांचे वाढते प्रमाण, दुर्गंधी आणि पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नदीकाठावरील अतिक्रमणाचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अनेक ठिकाणी नदीपात्रालगत मुरूम, माती आणि बांधकामातील राडारोडा टाकून भराव करण्यात आल्याचे आढळून आले. त्यानंतर या जागांवर पत्र्याची शेड उभारून किंवा तात्पुरती बांधकामे करून नदीकाठ हळूहळू गिळंकृत केला जात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. काही भागांत नदीची मूळ हद्द ओळखणेही कठीण झाले आहे.

पर्यावरण अभ्यासकांच्या मते, नदीपात्रातील वाढते अतिक्रमण भविष्यात मोठ्या पूरस्थितीस कारणीभूत ठरू शकते. नदीचा नैसर्गिक प्रवाह अरुंद झाल्यास मुसळधार पावसाच्या काळात पाणी शहराच्या वस्त्यांमध्ये घुसण्याचा धोका वाढू शकतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ पर्यावरणापुरता मर्यादित नसून शहराच्या सुरक्षिततेशीही संबंधित आहे.

औद्योगिक पट्ट्यालगतच्या काही नाल्यांमधून रंग बदललेले आणि फेसाळ पाणी थेट नदीत मिसळताना दिसत आहे. स्थानिकांच्या मते, काही उद्योगांकडून रासायनिक सांडपाणी प्रक्रिया न करता नदीत सोडले जात आहे. यामुळे नदीतील जलचरांवर गंभीर परिणाम झाला असून पूर्वी मासेमारी करणारे अनेक नागरिक आता नदीकाठापासून दूर राहणे पसंत करत आहेत. नदी संवर्धन, सुशोभीकरण आणि स्वच्छतेसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च झाल्याचे दावे प्रशासनाकडून वारंवार केले जात असले, तरी प्रत्यक्षात नदीची अवस्था अधिकच बिकट होत असल्याचे चित्र आहे. नदीकाठांवर नियमित गस्त, सीसीटीव्ही निरीक्षण आणि कठोर दंडात्मक कारवाईचा अभाव असल्याने अतिक्रमण आणि कचरा टाकण्याचे प्रकार बिनधास्तपणे सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

पवना नदी ही पिंपरी-चिंचवड शहराची जीवनवाहिनी मानली जाते. मात्र विकासाच्या नावाखाली तिचे अस्तित्वच धोक्यात येत असेल, तर त्याची मोठी किंमत भविष्यात शहराला मोजावी लागू शकते. प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना करून अतिक्रमण हटवणे, प्रदूषण रोखणे आणि नदी संवर्धनासाठी प्रभावी मोहीम राबवणे आवश्यक असल्याची मागणी पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून होत आहे.

# मोठ्या सोसायट्यांना कंपोस्ट प्रकल्प सक्तीचा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या, मंगल कार्यालये, शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, कंपन्या, कॅन्टीन, खानावळी आणि इतर मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांना आता त्यांच्या परिसरातच ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावावी लागणार आहे. १ जुलैपासून अशा आस्थापनांकडील ओला कचरा महापालिका उचलणार नसल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने २७ जानेवारी २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने १९ फेब्रुवारी, २९ एप्रिल आणि ५ मे २०२६ रोजी दिलेल्या आदेशांनुसार मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांना त्यांच्या आवारातच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे सक्तीचे करण्यात आले आहे. दररोज १०० किलो किंवा त्यापेक्षा अधिक कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापना, २० हजार चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या संस्था तसेच दररोज ४० हजार लिटर किंवा त्यापेक्षा अधिक पाण्याचा वापर करणाऱ्या आस्थापनांना हा नियम लागू होणार आहे.

# मुख्य लेखा अधिकारी प्रवीण जैन यांची उचलबांगडी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेतील ६० कोटी १८ लाख रुपयांच्या कथित बोगस उपसूचना घोटाळ्याप्रकरणी राज्य शासनाने मोठी प्रशासकीय कारवाई केली आहे. या प्रकरणातील प्रमुख जबाबदार अधिकारी म्हणून नाव समोर आलेले महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांची तात्काळ बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी नवी मुंबई महापालिकेचे मुख्य लेखा अधिकारी सत्यवान किशनराव उबाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



शासनाच्या वित्त विभागाने शुक्रवारी यासंदर्भातील आदेश जारी केले. या निर्णयामुळे महापालिकेच्या प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून घोटाळ्याप्रकरणी आणखी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महापालिकेच्या २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात बोगस उपसूचनांच्या माध्यमातून विविध तरतुदींमध्ये वाढ आणि घट करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रक्रियेद्वारे विशिष्ट ठेकेदारांना आर्थिक लाभ मिळवून देण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. हा प्रकार स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी उघडकीस आणला होता. मुख्य लेखा व वित्त अधिकारी या नात्याने अर्थसंकल्पीय तरतुदींमधील अनियमितता रोखणे आणि आर्थिक शिस्त राखणे ही प्रवीण जैन यांची जबाबदारी होती. मात्र नियमबाह्य आर्थिक मंजुरी प्रक्रियेला आक्षेप घेण्याऐवजी त्यांनी त्यास सहकार्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ठेकेदारांच्या फायद्यासाठी बिले मंजूर करून घेण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचा ठपकाही त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी अभिषेक बारणे यांनी शासनाकडे तक्रार दाखल करून जैन यांच्यावर कठोर कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीत गंभीर अनियमितता आढळल्याची माहिती समोर आली. चौकशी समितीने महापालिकेच्या तिजोरीवर दरोडा टाकण्यास हातभार लावल्याचा तसेच शासकीय नियमांना बगल देत ठेकेदारांशी संगनमत केल्याचा ठपका जैन यांच्यावर ठेवला आहे.

महापालिकेच्या आर्थिक हिताचे संरक्षण करण्याऐवजी आर्थिक शिस्त भंग होण्यास कारणीभूत ठरल्याचे निष्कर्ष समोर आल्यानंतर शासनाने त्यांची तडकाफडकी उचलबांगडी करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, नवी मुंबई महापालिकेत मुख्य लेखा अधिकारी म्हणून कार्यरत असलेले सत्यवान किशनराव उबाळे यांची पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वित्तीय सल्लागार तथा मुख्य लेखा अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## नवीन शैक्षणिक वर्षात प्रक्रिया पुन्हा सुरू होणार

# पिंपरीत अपार आयडी नोंदणीला तात्पुरता ब्रेक

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** केंद्र सरकारच्या 'वन नेशन, वन स्टुडंट आयडी' उपक्रमाअंतर्गत देशभरातील विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात येणाऱ्या अपार आयडी नोंदणी प्रक्रियेला सध्या तात्पुरता ब्रेक लागला आहे. अपार आयडी तयार करण्यासाठीचे पोर्टल सध्या बंद असल्याने विद्यार्थ्यांची नोंदणी थांबली असून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर ही प्रक्रिया पुन्हा सुरू होणार आहे.




राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत 'एक राष्ट्र, एक विद्यार्थी ओळख' या संकल्पनेतून ऑटोमेटेड परमनंट अकॅडमिक अकाउंट रजिस्ट्री अर्थात अपार आयडी प्रणाली विकसित करण्यात आली आहे. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी १२ अंकी स्वतंत्र डिजिटल ओळख क्रमांक तयार करण्यात येत असून तो विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शैक्षणिक प्रवासाची नोंद ठेवणार आहे. उच्च शिक्षण संचालनालयाने राज्यातील सर्व विद्यापीठांना अपार आयडी नोंदणीबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार सर्व संलग्न महाविद्यालये, स्वायत्त संस्था आणि पदव्युत्तर विभागांमधील विद्यार्थ्यांची शंभर टक्के नोंदणी पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड शहरात आतापर्यंत सुमारे ८६ टक्के विद्यार्थ्यांची अपार आयडी नोंदणी पूर्ण झाल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली. अपार आयडीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रे, गुणपत्रिका, पदव्या, प्रमाणपत्रे आणि शैक्षणिक श्रेयांक डिजिटल स्वरूपात एकत्रित आणि सुरक्षित ठेवणे हा आहे. हा आयडी विद्यार्थ्यांसाठी आजीवन वैध राहणार असून शाळा, महाविद्यालय किंवा विद्यापीठ बदलताना शैक्षणिक माहितीची देवाणघेवाण सुलभ होणार आहे. शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, भविष्यात प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती योजना, शैक्षणिक अनुदाने आणि विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी अपार आयडी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने हा आयडी तयार करणे आवश्यक आहे.

अपार आयडी आधार कार्ड आणि डिजिलॉकरशी लिंक करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची सर्व शैक्षणिक माहिती डिजिटल स्वरूपात सुरक्षित राहणार असून ती आवश्यकतेनुसार सहज उपलब्ध होऊ शकणार आहे. अपार आयडी तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना डिजिलॉकर अ‍ॅप किंवा संकेतस्थळावर आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकाच्या मदतीने खाते तयार करावे लागते. त्यानंतर संबंधित शैक्षणिक संस्थेची माहिती भरून आवश्यक परवानग्या दिल्यानंतर १२ अंकी अपार आयडी तयार केला जातो.

शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, गेल्या वर्षी शहरात ८६ टक्के नोंदणी पूर्ण झाली होती. मात्र आता दहावी व बारावीचे विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून बाहेर पडतील आणि नव्याने प्रवेश घेणारे विद्यार्थी प्रणालीत समाविष्ट होतील. त्यामुळे नवीन शैक्षणिक वर्षात आकडेवारीत बदल होणार आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होताच अपार पोर्टल पुन्हा कार्यान्वित होणार असून उर्वरित विद्यार्थ्यांची नोंदणी पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याची आहे.

# निळू फुले नाट्यगृहातील अग्निसुरक्षेचा बोजवारा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृहातील अग्निसुरक्षा व्यवस्थेबाबत गंभीर निष्काळजीपणा समोर आला असून नाट्यगृहात बसविण्यात आलेले अनेक अग्निशामक सिलिंडर कालबाह्य झाल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या हजारो प्रेक्षकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून नागरिकांनी प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

निळू फुले नाट्यगृहात दररोज नाटके, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक उपक्रम, व्याख्याने आणि विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यामुळे बालकांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत मोठ्या संख्येने नागरिक येथे उपस्थित असतात. अशा ठिकाणी अग्निसुरक्षा यंत्रणा अत्याधुनिक आणि कार्यक्षम असणे आवश्यक असताना कालबाह्य अग्निशामक उपकरणे आढळल्याने निष्काळजीपणा उघड झाला आहे. प्रवेशद्वारांजवळ, आपत्कालीन बाहेर पडण्याच्या मार्गांवर, रंगमंचाच्या दोन्ही बाजूंना, बॅकस्टेज परिसरात, मेकअप रूममध्ये, ध्वनी व प्रकाश नियंत्रण विभागात, विद्युत पॅनल रूममध्ये, कॉरिडॉर, जिने आणि प्रेक्षक बसण्याच्या हॉलमध्ये सुमारे ४० अग्निशामक सिलिंडर आणि फायर बॉल बसविण्यात आले आहेत. मात्र यापैकी अनेक उपकरणांची वैधता मुदत संपल्याचे निदर्शनास आले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### रासप शिरुर तालुका अध्यक्षपदी शरद इंगळे



**रांजणगाव गणपती :** इंगळेनगर, ता.शिरुर येथील युवा कार्यकर्ते शरद इंगळे यांची राष्ट्रीय समाज पक्षाच्या शिरुर तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. इंगळे यांना पक्षाचे जिल्हाध्यक्ष तानाजी शिंगाडे यांनी निवडीचे पत्र दिले. राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे माजी मंत्री महादेव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय समाज पक्षाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करणार असल्याचे नूतन तालुकध्यक्ष इंगळे निवडीनंतर बोलताना सांगितले.

### आपले सरकार पोर्टलमध्ये बिघाड

**मंचर :** राज्य शासनाच्या विविध ऑनलाइन सेवांसाठी महत्त्वाचे मानले जाणारे 'आपले सरकार' पोर्टल गेल्या महिनाभरापासून तांत्रिक बिघाडामुळे संथ झाले असून, त्यामुळे आंबेगाव तालुक्यातील नागरिक, विद्यार्थी आणि पालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. २८ एप्रिलपासून सुरू झालेली ही समस्या मे महिन्याचा शेवट आला तरी कायम असल्याने विविध दाखल्यांसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. दहावी आणि बारावीच्या निकालानंतर विद्यार्थी अकरावी, तंत्रनिकेतन तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी तयारी करत आहेत. या प्रवेशासाठी उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला आणि नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक असल्याने तालुक्यातील सेवा केंद्रांवर मोठी गर्दी होत आहे. मात्र, पोर्टल वारंवार बंद पडणे, सर्व्हर प्रतिसाद न देणे तसेच फोटो अपलोड न होणे अशा तांत्रिक अडचणींमुळे अनेक अर्ज प्रलंबित राहिले आहेत.

### अवसरी फाटा-अवसरी बुद्रुक रस्त्याची दुरवस्था कायम

# अर्धवट खड्डे बुजवून ठेकेदार गायब

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** अवसरी फाटा ते अवसरी बुद्रुक या सुमारे आठ किलोमीटरच्या मार्गावरील खड्ड्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून अर्धवट दुरुस्ती करून ठेकेदार गायब झाल्याने वाहनचालक आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. गेल्या दीड वर्षांपासून या मार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली असून दररोज हजारो नागरिकांना खड्ड्यांमधून मार्ग काढत प्रवास करावा लागत आहे.



रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि प्रवासी यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा किरकोळ अपघात घडूनही संबंधित यंत्रणेकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. रस्त्याच्या दुरवस्थेबाबत अवसरी बुद्रुक आणि अवसरी खुर्द ग्रामपंचायतींनी संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा केला. यासंदर्भात लेखी पत्रव्यवहारही करण्यात आला. माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनीही संबंधित ठेकेदाराला तातडीने खड्डे बुजविण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतरही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झाली नाही.

दरम्यान, सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी अवसरी बुद्रुक येथे रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर ठेकेदाराने काही प्रमाणात दुरुस्तीचे काम सुरू केले. अवसरी फाटा ते अवसरी खुर्द हद्दीतील काही खड्डे डांबर टाकून बुजविण्यात आले. मात्र अवसरी खुर्द ते अवसरी बुद्रुक या मार्गावरील मोठ्या प्रमाणातील खड्डे तसेच ठेवून ठेकेदाराने काम बंद केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी खड्डे बुजविण्यात आले आहेत, तेथेही निवडक खड्ड्यांवरच मलमपट्टी करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी मोठे खड्डे कायम असून पावसाळ्यात त्यामध्ये पाणी साचल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अर्धवट दुरुस्तीमुळे वाहनचालकांचा संताप वाढला असून संपूर्ण मार्गाचे तातडीने डांबरीकरण करण्याची मागणी जोर धरत आहे. अवसरी फाटा ते निरगुडसर, पारगाव, पिंपरखेड, जांबुत आणि शिक्रापूर या सुमारे ७५ किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीटीकरण, रुंदीकरण आणि गटार योजनेसाठी सुमारे ४१८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या प्रकल्पाला मंजुरी मिळून एक वर्ष उलटले तरी अवसरी फाटा ते अवसरी बुद्रुक या टप्प्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दीड वर्षांत खड्ड्यांच्या प्रश्नावर अनेकदा आवाज उठविण्यात आला. प्रत्येक वेळी ठेकेदार काही निवडक ठिकाणी खड्डे बुजवून काम बंद करतो. विशेषतः अवसरी खुर्द बसस्थानक परिसरातील खड्ड्यांवर तात्पुरती मलमपट्टी केली जाते; मात्र उर्वरित मार्गाकडे दुर्लक्ष केले जाते. एक खड्डा बुजवायचा आणि चार-पाच खड्डे तसेच ठेवायचे, अशीच भूमिका ठेकेदाराची असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

वाहनचालकांनी आता संबंधित ठेकेदाराकडील नवीन सिमेंट रस्त्याचे काम काढून घेण्याची मागणी केली आहे. येत्या आठ दिवसांत अवसरी खुर्द, गावडेवाडी आणि अवसरी बुद्रुक परिसरातील सर्व खड्डे बुजवून संपूर्ण रस्त्याचे तात्पुरत्या स्वरूपात डांबरीकरण करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. रस्त्याच्या प्रश्नाकडे प्रशासन आणि संबंधित विभागाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असून पावसाळ्यापूर्वी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## भरदिवसा महिलेचे अडीच तोळ्यांचे मंगळसूत्र लंपास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी येथे भरदिवसा एका ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून दोन अज्ञात चोरट्यांनी पलायन केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पारगाव कारखाना पोलीस ठाण्यात या प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

खडकवाडी येथे बुधवारी (दि. २७) सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सिंधू बाळासाहेब गाडगे (वय ६०) या महिला खेड तालुक्यातील गाडकवाडी येथील रहिवासी असून त्या खडकवाडी मार्गे खुडावस्ती येथे आपल्या भावाकडे जात होत्या. त्यावेळी खडकवाडी येथील भैरवनाथ मंदिर आणि स्मशानभूमी परिसरात मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांना लक्ष्य केले. चोरट्यांनी क्षणार्धात त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावण्याचा प्रयत्न केला. यावेळी महिलेने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केल्याने काही क्षण झटापट झाली. या झटापटीत दोन पदरी सोन्याच्या मंगळसूत्रातील एक माळ तुटली आणि त्यातील सुमारे अर्धा तोळा वजनाचे मणी खाली पडले. मात्र उर्वरित अडीच तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र घेऊन चोरट्यांनी मोटारसायकलवरून वेगाने पलायन केले.

भरदिवसा घडलेल्या या चोरीमुळे संताप व्यक्त केला जात आहे. लोणी येथे दर बुधवारी भरविण्यात येणाऱ्या आठवडे बाजारासाठी खेड, आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यातील सुमारे ३० ते ३५ गावांतील नागरिक मोठ्या संख्येने येत असतात. या गर्दीचा फायदा घेत बुरटे चोर आणि गुन्हेगार अशा घटना घडवत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

## बाजरीच्या वैरणीचे भरघोस उत्पादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** यंदा अनुकूल हवामानामुळे आंबेगाव तालुक्यात उन्हाळी बाजरीचे विक्रमी उत्पादन झाले असून धान्यासह वैरणीचेही भरघोस उत्पन्न मिळाल्याने शेतकरी समाधानी आहेत. पावसाळा तोंडावर आल्याने जनावरांसाठी वर्षभराचा सुका चारा उपलब्ध राहावा यासाठी शेतकरी सध्या बाजरीच्या पेंढ्यांच्या वळई रचण्याच्या कामात व्यस्त झाले आहेत. तालुक्यातील अनेक गावांमध्ये वैरण साठवणीची लगबग सुरू असून ग्रामीण भागात सर्वत्र वळईंची रांग दिसू लागली आहे.



आंबेगाव तालुक्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर उन्हाळी बाजरीची लागवड केली जाते. तालुक्याच्या पूर्व आणि पश्चिम भागातील बहुतांश शेतकरी या पिकाला प्राधान्य देतात. यंदा पिकाच्या वाढीस पोषक हवामान मिळाल्याने बाजरीचे उत्पादन चांगले झाले. कणसांचे उत्पादन वाढल्याबरोबरच वैरणीचेही भरघोस उत्पन्न मिळाल्याने शेतकऱ्यांना दुहेरी फायदा झाला आहे.

बाजरीची कणसे काढून धान्य तयार केल्यानंतर उरलेल्या पेंढ्यांचा उपयोग जनावरांच्या चाऱ्यासाठी केला जातो. विशेषतः पावसाळ्यात हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी होत असल्याने बाजरीची वैरण पशुपालकांसाठी महत्त्वाची ठरते. ओल्या वातावरणात जनावरे हा सुका चारा आवडीने खात असल्याने त्याची मागणी कायम राहते. त्यामुळे शेतकरी वर्षभराचा चारा उपलब्ध राहावा यासाठी आतापासूनच साठवणुकीवर भर देत आहेत.

तालुक्यातील अनेक शेतकरी स्वतःच्या शेतातील वैरण साठवण्याबरोबरच इतर शेतकऱ्यांकडूनही वैरण खरेदी करत आहेत. मोठमोठ्या पेंड्या तयार करून त्यांची वळई उभारण्यात येत असून काही ठिकाणी शेतकरी कुटुंबातील सर्व सदस्य या कामात सहभागी झाले आहेत. चांडोली खुर्दसह अनेक गावांमध्ये वैरणीच्या उंच वळई ग्रामीण भागाचे आकर्षण ठरत आहेत. यंदा वैरण मुबलक उपलब्ध झाल्यामुळे पशुपालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. सध्या बाजरीच्या वैरणीच्या पेंड्यांना शेकड्यामागे सुमारे एक हजार ते अकराशे रुपये दर मिळत असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली.

## पृथ्वीराज जाचक यांच्या नेतृत्वात विकासाला गती

### श्री छत्रपती कारखान्याच्या संचालक मंडळाची यशस्वी वर्षपूर्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** आर्थिक अडचणींच्या गर्तेत सापडलेल्या श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याला नवसंजीवनी देत अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाने यशस्वीपणे एक वर्ष पूर्ण केले आहे. या वर्षभरातील कामगिरीबद्दल संचालक मंडळाने दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतिस्थळाला भेट देऊन अभिवादन केले. तसेच श्री भवानी मातेच्या मंदिरात आरती करून कारखाना परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज आणि इतर महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.



२८ मे २०२५ रोजी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पृथ्वीराज जाचक यांची कारखान्याच्या अध्यक्षपदी, तर कैलास गावडे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली होती. त्यानंतर गेल्या एका वर्षात संचालक मंडळाने कारखान्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्न केले. आर्थिक संकटामुळे ऊस उत्पादक शेतकरी आणि सभासदांमध्ये निर्माण झालेला अविश्वास दूर करण्याचे मोठे आव्हान नव्या व्यवस्थापनासमोर होते. मात्र पारदर्शक कारभार, शिस्तबद्ध नियोजन आणि ऊस उत्पादकांना केंद्रस्थानी ठेवून घेतलेल्या निर्णयांमुळे कारखान्याबाबत पुन्हा विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यात यश आले. विशेषतः वजन काट्यातील पारदर्शकता, गाळपास आलेल्या उसाचे वेळेत देयक अदा करणे आणि ऊस तोडणीमध्ये कोणताही भेदभाव न करता नियमांनुसार कामकाज करणे या निर्णयांचे शेतकरी वर्गातून स्वागत झाले.

कारखान्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासालाही या काळात गती मिळाली. याशिवाय कामगारांच्या वेतनवाढीचा निर्णय घेण्यात आला. पृथ्वीराज जाचक यांनी सुरुवातीपासूनच संस्था ही व्यक्तीपेक्षा मोठी असते आणि आपण केवळ तिचे विश्वस्त आहोत, या भूमिकेतून कामकाजाला प्राधान्य दिले. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आणि जबाबदारीचे तत्त्व कायम ठेवण्यात आले. याचाच परिणाम म्हणून कारखान्याच्या विकासकामांना गती मिळाली.

यावेळी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक, उपाध्यक्ष कैलास गावडे, संचालक अ‍ॅड. शरद जामदार, शिवाजी निंबाळकर, रामचंद्र निंबाळकर, पृथ्वीराज घोलप, प्रशांत दराडे, अजित नरुटे, विठ्ठलराव शिंगाडे, अनिल काटे, बाळासाहेब कोळेकर, संतोष मासाळ, निलेश टिळेकर, सतीश देवकाते, अशोक पाटील, मंथन कांबळे, डॉ. योगेश पाटील, तानाजी शिंदे, माधुरी राजपुरे, सुचिता सपकळ, कार्यकारी संचालक अशोक जाधव, जनरल मॅनेजर हनुमंत करवर, सचिन सपकळ आदी उपस्थित होते.

## कनेरसर-पाबळ मार्गावरील खड्डे बुजले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील कनेरसर येथील गोगावले वस्ती ते पाबळ (ता. शिरूर) या मार्गावरील धोकादायक खड्ड्यांमुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ आणि स्थानिक तरुण कार्यकर्त्यांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर आमदार बाबाजी काळे यांनी तातडीने दखल घेत संबंधित विभागाला आवश्यक सूचना दिल्या. त्यानुसार प्रशासनाने युद्धपातळीवर काम हाती घेत रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण केले आहे.



गेल्या काही महिन्यांपासून या मार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत होता. विशेषतः दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर हे खड्डे अधिक धोकादायक बनले होते. अनेकदा किरकोळ अपघातही घडल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी होती.

या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. याची माहिती मिळताच आमदार बाबाजी काळे यांनी तत्काळ संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून रस्ता दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर प्रशासनाने आवश्यक यंत्रणा आणि मनुष्यबळ उपलब्ध करून देत रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण केले.

रस्त्याची दुरुस्ती झाल्यानंतर ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. "रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट झाल्याने दैनंदिन प्रवास करताना मोठा त्रास सहन करावा लागत होता. विशेषतः शाळकरी मुले, महिलावर्ग आणि वृद्ध नागरिकांसाठी हा मार्ग धोकादायक बनला होता. आमदार बाबाजी काळे यांनी तातडीने दखल घेतल्यामुळे आमचा प्रश्न मार्गी लागला," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. स्थानिक नागरिकांनी आमदार बाबाजी काळे तसेच संबंधित प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## खेड मतदारसंघात मतदार यादी पुनर्निरीक्षणाला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या विशेष मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहिमेला खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघात चांगला प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत ६२.४९ टक्के काम पूर्ण झाले आहे. मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी महसूल प्रशासन आणि निवडणूक यंत्रणा युद्धपातळीवर काम करत असल्याची माहिती तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी दिली.

खेड तालुक्यातील एकूण मतदारसंख्या ३ लाख ८४ हजार ४४५ इतकी आहे. यापैकी २ लाख ४० हजार २५८ मतदारांची पडताळणी पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरित मतदारांची माहिती अद्ययावत करण्याचे काम सुरू असून केंद्रस्तरीय अधिकारी आणि बूथ लेव्हल अधिकारी मतदान केंद्रनिहाय घरोघरी जाऊन पडताळणी करत आहेत. विशेषतः मतदार यादीतील अस्पष्ट छायाचित्रे, नावांमधील चुका, पत्त्यातील त्रुटी आणि इतर तांत्रिक बाबी दुरुस्त करण्यावर भर देण्यात येत आहे. निवडणूक नायब तहसीलदार मनिषा खैरे यांनी सांगितले की, खेड तालुक्यातील सुमारे १३ हजारांहून अधिक मतदारांची नावे इतर लोकसभा किंवा विधानसभा मतदारसंघांमध्येही आढळून आली आहेत. अशा दुबार नोंदींची खातरजमा करण्यासाठी संबंधित मतदारांशी थेट संपर्क साधला जात आहे. मतदारांनी पुढाकार घेऊन आपल्या नावांची पडताळणी करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. यासाठी आयोगाच्या ईसीआयनेट ॲपचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आपले नाव, मतदार केंद्र क्रमांक, मतदारसंघ क्रमांक आणि अनुक्रमांक तपासून मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करावी.

## खेड तालुक्यात सौरऊर्जेचा विस्तार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यात अपारंपरिक ऊर्जाक्षेत्रात मोठी झेप घेतली जात असून येत्या महिनाभरात तालुक्यातील विविध भागांमध्ये उभारण्यात आलेले सौरऊर्जा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहेत. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या या प्रकल्पांमधून एकूण २५ मेगावॅट वीज उत्पादन होणार असून त्यामुळे तालुक्यातील औद्योगिक, व्यावसायिक आणि घरगुती वीज ग्राहकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

वीजेची वाढती मागणी, औद्योगिकीकरणाचा वेग आणि पर्यावरणपूरक ऊर्जास्रोतांचा वाढता वापर लक्षात घेऊन महावितरणने खेड तालुक्यात विविध ठिकाणी सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यास प्राधान्य दिले आहे. या प्रकल्पांमुळे पारंपरिक ऊर्जास्रोतांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार असून हरित ऊर्जेला चालना मिळणार आहे.

राजगुरुनगर विभागाचे उपकार्यकारी अभियंता उत्तम मंचरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, तालुक्यातील कडूस, कोरेगाव, पांगरी तसेच खेड विशेष आर्थिक क्षेत्र परिसरात सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आले आहेत. कडूस येथील शेंडेवाडी परिसरात पाच एकर क्षेत्रात उभारण्यात आलेला पाच मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प कार्यान्वित झाला असून तो कडूस वीज उपकेंद्राशी जोडण्यात आला आहे. याशिवाय कोरेगाव येथे ३० एकर क्षेत्रात सहा मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात आला आहे. खेड सेझ परिसरातील पुर आणि कनेरसर भागात सुमारे ५० एकर क्षेत्रात १० मेगावॅट क्षमतेचा मोठा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला असून तो येत्या महिनाभरात सुरू होणार आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील औद्योगिक वीज मागणी पूर्ण करण्यास मोठी मदत होणार आहे.

पांगरी येथे २५ एकर क्षेत्रात उभारण्यात आलेला पाच मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प नुकताच कार्यान्वित करण्यात आला. या प्रकल्पाच्या लोकार्पणावेळी उपकार्यकारी अभियंता उत्तम मंचरे आणि राजगुरुनगर शहर शाखेचे अभियंता प्रमोद जाधव उपस्थित होते. पांगरी येथे निर्मित होणारी वीज ११ केव्ही वाहिनीद्वारे चांडोली येथील ३३ केव्ही उपकेंद्रात पोहोचविण्यात येत आहे.

सहाय्यक अभियंता प्रमोद जाधव यांनी सांगितले की, पांगरी प्रकल्पातून उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाच मेगावॅट विजेमुळे राजगुरुनगर शहरासह परिसरातील वीज पुरवठा अधिक सक्षम होईल. वीज दाबातील चढ-उतार कमी होण्यास मदत होईल तसेच अखंडित आणि दर्जेदार वीज पुरवठा राखणे शक्य होणार आहे. त्यामुळे ग्राहकांना लोडशेडिंग आणि कमी दाबाच्या समस्येपासून मोठ्या प्रमाणात दिलासा मिळेल.

### शरद बुट्टे पाटील यांचे प्रतिपादन

# दिलीप पाटील यांच्यासारख्या परिपक्व नेतृत्वाची गरज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** आमदार असताना विकासकामांचा झपाटा कायम ठेवणारे, पद नसतानाही तालुक्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणणारे आणि सर्वसामान्यांच्या समस्या तत्परतेने सोडविणारे लोकनेते म्हणून माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्याकडे आजही जनतेचा विश्वासाने पाहण्याचा दृष्टिकोन आहे. खेड तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या सारख्या परिपक्व, अनुभवी आणि धोरणी नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे मत जिल्हा परिषदेचे माजी सभापती शरद बुट्टे पाटील यांनी व्यक्त केले.



माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या ६८ व्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी राजगुरुनगर येथील त्यांच्या निवासस्थानी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यावेळी आयोजित कार्यक्रमात शरद बुट्टे पाटील बोलत होते. दिलीप मोहिते पाटील यांचा वाढदिवस तालुकाभर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या उपक्रमांद्वारे उत्साहात साजरा करण्यात आला. राजगुरुनगर येथील निवासस्थानी दिवसभर कार्यकर्त्यांची आणि शुभेच्छुकांची गर्दी पाहायला मिळाली. तालुक्याच्या विविध भागांसह तालुक्याबाहेरूनही अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.

वाढदिवसानिमित्त दिलीप मोहिते पाटील आणि त्यांच्या पत्नी सुरेखाताई मोहिते पाटील यांनी शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या सर्वांचे स्वागत केले.

कार्यक्रमास शिरूरचे माजी आमदार अशोक पवार, अरुण चांभारे, माजी सभापती अंकुश राक्षे, बहिरवाडीच्या सरपंच वसुधा राक्षे, जिल्हा परिषद सदस्या सुनीता बुट्टे पाटील, समीर सुपे, गणेश बोत्रे, दत्ता मांडेकर, सुनील देवकर, खरेदी-विक्री संघाचे लेखाधिकारी भास्कर जगदाळे, सुभाष मांडेकर, सिद्धेगव्हाणचे सरपंच दौलतराव मोरे, उद्योजक नीलेश येवले, राजगुरुनगर सहकारी बँकेच्या माजी उपाध्यक्षा अश्विनीताई पाचारणे, उद्योजक राजुशेठ पाचारणे, तिन्हेवाडीच्या सरपंच प्रतीक्षा पाचारणे, उपसरपंच कविता आरुडे, तिन्हेवाडी सोसायटीच्या अध्यक्षा कविता पाचारणे, रंगनाथ आरुडे, दिनेश कड, राजगुरुनगर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष शिवाजी मांदळे, नगरसेवक नीलेश घुमटकर, राजेंद्र जाधव, सागर सातकर, नंदकुमार मांदळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## घोडेगाव परिसरात केबल चोरीच्या घटनांत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** घोडेगाव पोलीस ठाणे हद्दीतील नदीकाठ, विहिरी आणि कालव्यांजवळ शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या विद्युत मोटारींच्या केबल चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. आधीच शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना केबल चोरीमुळे अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

चोरटे केबल जाळून त्यामधील तांबे वेगळे करत असल्याने तांबे चोरी करणारी संघटित टोळी सक्रिय झाल्याचा संशय शेतकरी व्यक्त करत आहेत. गेल्या महिनाभरापासून वारंवार चोरीच्या घटना घडत असतानाही पोलिसांना अद्याप आरोपींचा माग काढता आलेला नाही. नदीकाठ आणि शेतांमधील वीज पंपांवर चोवीस तास लक्ष ठेवणे शक्य नसल्यामुळे चोरट्यांना सहज संधी मिळत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

घोडेगाव परिसरात तांब्याच्या केबलसह सिंगल फेज स्टार्टर आणि विद्युत ट्रान्सफॉर्मर चोरीच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. मोठ्या प्रमाणात चोरीच्या घटना वाढूनही चोरट्यांचा शोध लागत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत असल्याचे शेतकरी गणेश घोडेकर आणि प्रशांत काळे यांनी सांगितले.

## सारांश वृत्त

### तस्कराची कोटींची मालमत्ता जप्त

**श्रीनगर :** अंमली पदार्थांच्या तस्करीतून मिळणाऱ्या पैशांचा वापर करून मिळविलेल्या सुमारे दोन कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. पोलिस प्रवक्त्याने सांगितले की, श्रीनगर पोलिसांनी सध्या सुरू असलेल्या नशा मुक्त जम्मू-काश्मीर अभियानांतर्गत अंमली पदार्थांशी संबंधित कारवायांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींची अनेक स्थावर मालमत्ता जप्त केली आहे. बेमिना पोलिस ठाण्याने बेमिना येथील फिरदौस कॉलनी येथील रहिवासी मुदासिर अहमद पीर उर्फ साहिल उर्फ डोगे याची सुमारे १.५ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता जप्त केली आहे.

### मिझोरम सरकारचेही टॅक्सी अॅप जाहीर

**आयझॉल** : ओव्हरचार्जिंगला आळा घालण्यासाठी मिझोराम सरकारने सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी 'मिझोटॅक्सी' हे मोबाइल अॅप्लिकेशन सुरू करण्याची घोषणा केली आहे. हे अॅप सुरुवातीला आयझॉल शहरात सुरू केले जाईल आणि 1 जुलैपासून ते कार्यान्वित होईल, असे अधिकृत प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. टॅक्सी, दुचाकी टॅक्सी आणि ऑटो-रिक्षा वापरणार् या लोकांना सरकारने मंजूर केलेल्या योग्य भाडे पडताळण्यात आणि भरण्यास मदत करण्यासाठी याची रचना केली गेली आहे.

### रामबन भागात ट्रक दरीत कोसळला

**बनिहाल** : रामबन जिल्ह्यातील जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर शनिवारी एक ट्रक खोल दरीत कोसळून झालेल्या आगीत दोन जणांचा मृत्यू झाला. रामसू परिसरातील गंगरू जवळ हा अपघात झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चुनखडी घेऊन जाणारा ट्रक जम्मूहून श्रीनगरला जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. ट्रक दरीत घसरला आणि त्याला आग लागली. रामसू पोलिस ठाणे, हिमालयन क्विक रिस्पॉन्स टीम (क्यूआरटी), सीआरपीएफ आणि अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा यांच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि बचावकार्य सुरू केले.

---

### काँग्रेस विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड

# कर्नाटकाच्या मुख्यमंत्रीपदी डी. के. शिवकुमार

▪ दैनिक राज्य लोकतंत्र



**बंगळूरु :** कर्नाटकच्या राजकारणातील सत्ताबदलाच्या घडामोडींना शनिवारी निर्णायक वळण मिळाले असून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांची काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली. त्यामुळे राज्याच्या मुख्यमंत्रीपदी त्यांच्या नियुक्तीचा मार्ग अधिकृतपणे मोकळा झाला आहे. बंगळूरु येथील विधानसौधमध्ये झालेल्या काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

बैठकीत मावळते मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी विधिमंडळ पक्षाचा नेता निवडण्याचा अधिकार काँग्रेस हायकमांडकडे सोपविण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला ज्येष्ठ नेते डॉ. जी. परमेश्वर यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर काँग्रेस विधिमंडळ पक्षाने एकमताने डी. के. शिवकुमार यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. यावेळी सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या कामगिरीचे कौतुक करत त्यांच्या योगदानाबद्दल विशेष आभारही व्यक्त करण्यात आले.

दरम्यान, कर्नाटकातील नव्या सरकारच्या शपथविधीबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. काँग्रेस नेते डी. के. शिवकुमार यांचे आध्यात्मिक मार्गदर्शक आणि ज्योतिषी अजयस्वामी यांनी ३ जून रोजी सायंकाळी ५.१५ वाजता शपथविधी घेणे शुभ ठरेल, असा सल्ला दिल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीची संभाव्य तारीख म्हणून ३ जूनकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री सतीश जारकीहोळी यांनीही शिवकुमार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. "डी. के. शिवकुमार हेच कर्नाटकचे पुढील मुख्यमंत्री असतील. हायकमांडने याबाबत निर्णय घेतला असून सिद्धरामय्या यांनीही त्याची घोषणा केली आहे. राज्याच्या विकासाची गती कायम ठेवण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर असेल," असे जारकीहोळी म्हणाले.

माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या भविष्यातील राजकीय भूमिकेबाबतही चर्चांना उधाण आले आहे. काँग्रेस हायकमांडने त्यांना राज्यसभेची संधी दिल्याची चर्चा असली तरी त्यांनी ती स्वीकारण्यास नकार दिल्याचे सांगितले जात आहे. राज्याच्या राजकारणात सक्रिय राहून २०२८ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला पुन्हा सत्तेवर आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केल्याचे सूत्रांनी सांगितले.

नव्या सरकारच्या स्थापनेसाठी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल आणि कर्नाटक प्रभारी रणदीपसिंह सुरजेवाला बंगळुरूत दाखल झाले आहेत. मंत्रिमंडळाची रचना, खातेवाटप आणि सत्तांतराची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून पुढील काही दिवसांत नव्या सरकारचा शपथविधी सोहळा पार पडण्याची शक्यता आहे.

राज्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नव्या नेतृत्वाबाबत उत्साहाचे वातावरण असून डी. के. शिवकुमार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. कर्नाटकच्या राजकारणात गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या नेतृत्वबदलाच्या चर्चांवर अखेर पडदा पडला असून आता राज्याच्या राजकीय वाटचालीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

---

## डिझेलमध्ये आयसोब्युटॅनॉल मिश्रण अनिवार्य होणार?

▪ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रण कार्यक्रमाच्या यशानंतर आता केंद्र सरकार डिझेलमध्ये आयसोब्युटॅनॉल मिश्रण अनिवार्य करण्याच्या दिशेने पाऊल टाकत आहे. ट्रक, ट्रेलर आणि अन्य अवजड वाहनांसाठी वापरल्या जाणाऱ्या डिझेलमध्ये आयसोब्युटॅनॉल मिसळण्याचा आदेश याच वर्षी लागू होण्याची शक्यता असून, ऊर्जा सुरक्षा बळकट करणे आणि प्रदूषण कमी करणे हे यामागील उद्दिष्ट आहे.

भारतामध्ये पेट्रोलच्या तुलनेत डिझेलचा वापर जवळपास दुप्पट आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या आयातीवर मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. ही आयात कमी करण्यासाठी देशांतर्गत उत्पादित जैवइंधनाचा वापर वाढविण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. प्रारंभी डिझेलमध्ये पाच ते दहा टक्के आयसोब्युटॅनॉल मिश्रण करण्याची योजना आखण्यात आली आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक विभागाचे सचिव व्ही. उमाशंकर यांनी सांगितले की, डिझेलमध्ये आयसोब्युटॅनॉल मिश्रणाचा कार्यक्रम देशाच्या ऊर्जा सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाच्या तुलनेत या उपक्रमाचा परिणाम अधिक व्यापक असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तज्ज्ञांच्या मते, डिझेल इंजिनांसाठी आयसोब्युटॅनॉल हे इथेनॉलपेक्षा अधिक उपयुक्त आहे. इथेनॉल डिझेलमध्ये पूर्णपणे मिसळत नाही, तर आयसोब्युटॅनॉल डिझेलमध्ये एकसमानपणे मिसळते. तसेच ते कमी संक्षारक असल्यामुळे विद्यमान इंजिनांमध्ये मोठ्या तांत्रिक बदलांची आवश्यकता भासत नाही. पर्यावरणीय दृष्टीनेही या इंधनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. आयसोब्युटॅनॉलमुळे इंधनाचे ज्वलन प्रभावीपणे होते. त्यामुळे धूर, कणयुक्त प्रदूषण आणि कार्बन मोनॉक्साइडच्या उत्सर्जनात लक्षणीय घट होऊ शकते. वाढते वायुप्रदूषण आणि अवजड वाहनांमुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्या कमी करण्यासाठी हा उपाय महत्त्वाचा मानला जातो.

---

## अमेरिका-इराण करार अंतिम टप्प्यात

▪ दैनिक राज्य लोकतंत्र





**वॉशिंग्टन :** पश्चिम आशियातील तणाव कमी करण्यासाठी अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धबंदी विस्ताराच्या चर्चेला वेग आला असला, तरी होर्मुझ सामुद्रधुनीचे नियंत्रण, समुद्री वाहतूक आणि इराणच्या अणुकार्यक्रमासंदर्भातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर दोन्ही देशांमध्ये अद्याप मतभेद कायम आहेत.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रस्तावित कराराबाबत अंतिम निर्णय लवकरच घेतला जाईल, असे संकेत दिले आहेत. प्रस्तावित करारानुसार विद्यमान युद्धबंदी आणखी ६० दिवसांसाठी वाढविण्याचा विचार सुरू असून या कालावधीत व्यापक आणि दीर्घकालीन तोडगा काढण्यासाठी चर्चा सुरू राहणार आहे.

अमेरिकेची प्रमुख अट म्हणजे इराणने होर्मुझ सामुद्रधुनी आंतरराष्ट्रीय जहाजवाहतुकीसाठी निर्बंधमुक्त खुली करावी. तसेच समुद्रात पेरण्यात आलेल्या खाणी हटवून जागतिक तेलवाहतुकीचा मार्ग पूर्णपणे सुरक्षित करावा, अशीही मागणी वॉशिंग्टनकडून करण्यात आली आहे. याशिवाय इराणने अण्वस्त्र निर्मितीच्या कोणत्याही प्रयत्नांचा कायमस्वरूपी त्याग करावा आणि उच्च संवर्धित युरेनियम साठ्याबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी अमेरिकेची भूमिका आहे. मात्र, इराणने अमेरिकेच्या अनेक अटी फेटाळून लावल्या आहेत. चर्चेला अद्याप अंतिम स्वरूप आलेले नसून कोणताही करार झालेला नाही, असे तेहरानने स्पष्ट केले आहे. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेच्या घोषणांवर अविश्वास व्यक्त करत प्रत्यक्ष कृतीवरच निर्णय घेतला जाईल, अशी भूमिका मांडली आहे.

---

## टीएमसी नेत्यांसाठी भाजपचे दरवाजे सध्या बंद

▪ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये प्रचंड बहुमत मिळवून सत्तेवर आलेल्या भारतीय जनता पक्षाने तृणमूल काँग्रेसमधील नेत्यांना पक्षात सामावून घेण्याची कोणतीही घाई नसल्याचे स्पष्ट केले आहे. प्रदेश भाजप अध्यक्ष समिक भट्टाचार्य यांनी तृणमूल काँग्रेसचे अनेक खासदार आणि आमदार भाजपमध्ये प्रवेश करण्यास इच्छुक असल्याचा दावा करताना, सध्या अशा नेत्यांसाठी पक्षाचे दरवाजे बंद असल्याचे स्पष्ट केले.

वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत भट्टाचार्य म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत भाजपला स्वबळावर स्पष्ट जनादेश मिळाला आहे. त्यामुळे सत्ता मिळविण्यासाठी किंवा संघटन बळकट करण्यासाठी इतर पक्षांतील नेत्यांना सामावून घेण्याची आवश्यकता राहिलेली नाही. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मोठ्या प्रमाणावर झालेल्या पक्षांतराचा अनुभव पक्षासाठी धडा ठरल्याचे त्यांनी नमूद केले.

तृणमूल काँग्रेसचे अनेक विद्यमान खासदार आणि आमदार भाजपमध्ये येण्यास इच्छुक असल्याचा दावा करताना त्यांनी कोणाचेही नाव जाहीर करण्यास नकार दिला. मात्र, अशा प्रवेशाबाबत सध्या कोणताही विचार सुरू नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भट्टाचार्य म्हणाले की, आता निवडणुका जिंकण्यासाठी भाजपला तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांची गरज नाही. पक्षाने स्वतःच्या ताकदीवर विजय मिळविला असून संघटनात्मक बळावर जनतेचा विश्वास संपादन केला आहे. त्यामुळे राजकीय आयातीपेक्षा पक्षाच्या स्वतःच्या कार्यकर्त्यांना प्राधान्य दिले जाईल. तथापि, भविष्यात काही व्यक्तींना पक्षात प्रवेश देण्याची शक्यता त्यांनी पूर्णपणे नाकारली नाही.

राजकारणात परिस्थिती बदलत असते, मात्र कोणताही निर्णय सामूहिक स्वरूपात घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. भ्रष्टाचार, भरती घोटाळे किंवा कथित सिंडिकेट व्यवस्थेशी संबंधित नेत्यांना भाजपमध्ये स्थान दिले जाणार नाही, अशी भूमिकाही त्यांनी मांडली. तृणमूल काँग्रेस आणि भ्रष्टाचार हे आता समानार्थी शब्द बनले असल्याची टीका करताना त्यांनी पक्षातील काही व्यक्ती मात्र या कथित भ्रष्ट व्यवस्थेपासून दूर राहिल्या असल्याचे म्हटले.

२०२१ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी तृणमूलमधून मोठ्या प्रमाणावर भाजपमध्ये झालेले पक्षांतर पक्षाच्या अपेक्षेप्रमाणे फायदेशीर ठरले नाही, याची कबुलीही भट्टाचार्य यांनी दिली.

---

## गृहलक्ष्मी वरून कर्नाटक सरकारला भाजपचा सवाल

▪ दैनिक राज्य लोकतंत्र

**बंगळुरू :** कर्नाटक सरकारच्या महत्त्वाकांक्षी गृहलक्ष्मी योजनेच्या निधीवरून भाजपने काँग्रेस सरकारला घेरले आहे. भाजपचे आमदार एस. सुरेशकुमार यांनी मावळते मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना पत्र लिहून गृहलक्ष्मी योजनेअंतर्गत फेब्रुवारी आणि मार्च २०२५ या कालावधीतील सुमारे ५ हजार कोटी रुपयांच्या निधीचे काय झाले, याबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी केली आहे.

गृहलक्ष्मी योजनेचे लाभार्थी असलेल्या लाखो महिलांपर्यंत अनुदान पोहोचले नसल्याचा आरोप भाजपने केला आहे. मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळलेल्या सिद्धरामय्या यांनी या निधीबाबत राज्यातील जनतेला स्पष्ट माहिती द्यावी, असे सुरेशकुमार यांनी पत्रात म्हटले आहे. राजाजीनगरचे आमदार असलेल्या सुरेशकुमार यांनी करदात्यांच्या पैशातून उभारलेल्या सार्वजनिक निधीचा हिशेब देणे ही सरकारची नैतिक आणि आर्थिक जबाबदारी असल्याचे नमूद केले आहे. फेब्रुवारी आणि मार्च २०२५ मधील रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाली की नाही, याबाबत संभ्रम असल्याचा दावा त्यांनी केला.

पत्रात त्यांनी म्हटले आहे की, राज्याच्या तिजोरीवर पूर्ण नियंत्रण असलेल्या व्यक्ती म्हणून सिद्धरामय्या यांनी या निधीची सद्यस्थिती जनतेसमोर मांडावी. कार्यालय सोडण्यापूर्वी प्रलंबित रक्कम लाभार्थ्यांना वितरित करण्याचीही त्यांनी मागणी केली आहे. हा मुद्दा प्रथम डिसेंबर २०२५ मध्ये बेळगाव येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात भाजपचे आमदार महेश तेंगीनकाई यांनी उपस्थित केला होता. त्यावेळी फेब्रुवारी आणि मार्च २०२५ मधील गृहलक्ष्मी योजनेची रक्कम लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली नसल्याचा आरोप करण्यात आला होता.

---

### इंदिरा-राजीव गांधींच्या निर्णयांमुळे शेतकरी हिताला धक्का

## निशिकांत दुबे यांचा काँग्रेसवर आरोप

▪ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** माजी पंतप्रधान इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या कार्यकाळात भारताने बांगलादेशासोबत केलेल्या नदी पाणीवाटप करारांमुळे देशातील शेतकरी आणि सीमावर्ती राज्यांच्या हिताशी तडजोड झाली, असा आरोप भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी केला आहे. काँग्रेसने देशहितापेक्षा मतपेढीच्या राजकारणाला प्राधान्य दिल्याचा दावाही त्यांनी केला.

सामाजिक माध्यमावरील पोस्टद्वारे दुबे यांनी काँग्रेसच्या कारभारावर टीका करत गंगा, तिस्ता आणि ब्रह्मपुत्रा नद्यांच्या पाणीवाटपाचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी या करारांना काँग्रेसच्या इतिहासातील काळा अध्याय असे संबोधले.

दुबे म्हणाले की, ३० मे १९८२ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी बांगलादेशी शिष्टमंडळासोबत गंगा नदीच्या पाणीवाटपासाठी नव्याने सहमती दर्शविली होती. यापूर्वी १९७६ मध्ये झालेल्या करारानंतर १९७७ मध्ये पाच वर्षांसाठी व्यवस्था लागू करण्यात आली होती. त्यानंतर १९८२ मध्ये बांगलादेशचे तत्कालीन अध्यक्ष जनरल हुसैन मोहम्मद इर्शाद यांच्यासोबत आणि नंतर १९८५ मध्ये राजीव गांधी यांच्या काळात नव्याने करार करण्यात आले, असे त्यांनी नमूद केले. तिस्ता नदीच्या पाणीवाटपाचाही उल्लेख करताना दुबे यांनी १९८२-८३ च्या काळात नदीच्या पाण्याची विभागणी करण्यात आल्याचा दावा केला. त्यांच्या मते, देशातील अनेक राज्यांमध्ये शेतकरी पाण्याअभावी अडचणीत असताना नदीचे पाणी बांगलादेशाकडे वळविण्यात आले.

बिहार, झारखंड आणि उत्तर प्रदेशातील अनेक भागांमध्ये शेतकऱ्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. गंगा नदीत गाळ साचण्याची समस्या कायम असताना पाण्याचे वाटप बाहेरील देशाला करण्यात आले. तिस्ता नदी सिक्कीमची जीवनरेखा असून त्या नदीवर वीज निर्मिती आणि सिंचन प्रकल्प उभारण्याची क्षमता आहे. तसेच ब्रह्मपुत्रा नदी आसाम आणि पश्चिम बंगालसाठी अत्यंत महत्त्वाची असून तिचे पाणीही बांगलादेशात जाते, असे दुबे यांनी म्हटले.

काँग्रेसवर निशाणा साधताना त्यांनी बांगलादेशी घुसखोरांच्या प्रश्नाचाही उल्लेख केला. मतपेढीच्या राजकारणासाठी काँग्रेसने राष्ट्रीय हितापेक्षा वेगळी भूमिका घेतल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, भारत आणि बांगलादेश यांच्यातील नदी पाणीवाटपाचा इतिहास पाहता १९८२ मध्ये फरक्का बॅरेज परिसरातील गंगा नदीच्या पाणीवाटपाबाबत दोन्ही देशांमध्ये सामंजस्य करार झाला होता. १९७७ मधील कराराची मुदत संपल्यानंतर इंदिरा गांधी आणि बांगलादेशचे तत्कालीन नेते जनरल इर्शाद यांनी या नव्या व्यवस्थेवर सहमती दर्शविली होती.

या करारामुळे फरक्का येथे पाण्याच्या वाटपासाठी तात्पुरती चौकट तयार करण्यात आली होती.

तिस्ता नदीबाबत १९८३ मध्ये झालेल्या चर्चेनुसार तात्पुरती वाटप व्यवस्था निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार नदीच्या उपलब्ध पाण्यापैकी ३९ टक्के हिस्सा भारताला, ३६ टक्के हिस्सा बांगलादेशाला देण्यात आला होता, तर उर्वरित २५ टक्के पाण्याबाबत पुढील अभ्यासानंतर निर्णय घेण्याचे ठरले होते.

---

## उत्तराखंडात वन्यजीव मृत्यूंची मालिका

▪ दैनिक राज्य लोकतंत्र

**डेहराडून :** उत्तराखंडमध्ये वन्यजीवांच्या मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ होत असून खटिमा वन उपविभागात शुक्रवारी वाघाचे एक पिल्लू आणि हत्ती मृतावस्थेत आढळल्याने वन विभागात खळबळ उडाली आहे. गेल्या पंधरवड्यात राज्यात वाघांच्या मृत्यूच्या अनेक घटना समोर आल्या असून ताज्या घटनेमुळे वन्यजीव संरक्षणाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

पहिली घटना पीलीभीत व्याघ्र प्रकल्पाच्या सीमेलगत असलेल्या सुराई वन परिक्षेत्रात उघडकीस आली. नियमित गस्तीदरम्यान वन कर्मचाऱ्यांना बग्गा-५५ कंपार्टमेंट परिसरात एका मादी वाघाच्या पिल्लाचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

विभागीय वन अधिकारी हिमांशू बंगारी, उपविभागीय वन अधिकारी संचिता वर्मा यांच्यासह वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल सती आणि डॉ. हिमांशू पांगती यांच्या पथकाने मृत पिल्लाचे शवविच्छेदन केले. वन विभागाच्या प्राथमिक तपासानुसार मृत पिल्लाचे वय सुमारे आठ महिने होते. वरिष्ठ वन अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रादेशिक वर्चस्वाच्या संघर्षात किंवा इतर वाघांसोबत झालेल्या झटापटीत गंभीर जखमी झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. शवविच्छेदनानंतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून पिल्लाच्या पार्थिवावर सुराई वन परिसरात अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान, याच दिवशी आणखी एका घटनेत किलपुरा वन परिक्षेत्रात एका हत्तीचा मृतदेह आढळून आला. वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला.

उपविभागीय वन अधिकारी संचिता वर्मा यांनी प्राथमिक पाहणीनंतर हत्तीची शिकार झाल्याची शक्यता फेटाळून लावली. हत्तीचे दोन्ही सुळे सुरक्षित अवस्थेत आढळल्यामुळे शिकारीचा कोणताही पुरावा नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. घटनास्थळी आढळलेल्या खुणांवरून हा मृत्यू दोन नर हत्तींच्या संघर्षातून झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

---

### चकमकीत फरार गुन्हेगार जखमी

**भुवनेश्वर :** ओडिशातील झारसुगुडा जिल्ह्यात शनिवारी किमान ११ गुन्हेगारी प्रकरणांमध्ये हवा असलेला एक व्यक्ती पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत जखमी झाला. रेंगाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या चकमकीत जय चौहान यांच्या उजव्या पायाला गोळी लागली आणि त्यांना झारसुगुडा येथील जिल्हा मुख्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले. चौहान हा मोठ्या दरोड्याच्या योजनेचे नेतृत्व करत होता, जेव्हा पोलिसांनी कारवाई सुरू केली.

---

## अवैध वाळू उत्खनन प्रकरणी कारवाई

▪ दैनिक राज्य लोकतंत्र

**हैदराबाद :** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठ्या प्रमाणावरील अवैध वाळू उत्खनन प्रकरणात धडक कारवाई करत तब्बल २,४०७ कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराचा पर्दाफाश केला आहे. हैदराबाद, जयपूर आणि कोईम्बतूर येथे टाकलेल्या छाप्यांदरम्यान ईडीने अनेक महत्त्वाचे पुरावे जप्त केले असून नैसर्गिक संसाधनांच्या लुटीचे संघटित जाळे उघडकीस आणले आहे.

मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत २६ मे रोजी ईडीच्या हैदराबाद विभागीय कार्यालयाने एकाच वेळी आठ ठिकाणी शोधमोहीम राबवली. या कारवाईत मेसर्स जीसीकेसी प्रोजेक्ट्स अँड वर्क्स प्रा. लि., मेसर्स प्रतिमा इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि मेसर्स टर्नकी एंटरप्रायझेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या कार्यालयांची झडती घेण्यात आली. याशिवाय बोइनिपल्ली श्रीनिवास राव, अशोक कुमार आणि खाण व भूगर्भशास्त्र विभागाचे माजी संचालक व्ही. जी. वेंकट रेड्डी यांच्या निवासस्थानांवरही छापे टाकण्यात आले. या कारवाईदरम्यान १.५३ कोटी रुपयांची रोख रक्कम, १,८०० अमेरिकी डॉलर्स, सुमारे १.२९ कोटी रुपयांची चांदी तसेच डिजिटल उपकरणे, मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे आणि अन्य महत्त्वाचे दस्तऐवज जप्त करण्यात आले.


या प्रकरणाची सुरुवात आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दाखल केलेल्या गुन्ह्यापासून झाली होती.

---

### लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांचे प्रतिपादन

# ऑपरेशन सिंदूरने क्षमतांचा नवा मापदंड निश्चित केला

▪ दैनिक राज्य लोकतंत्र





**खडकवासला :** बदलत्या जागतिक सुरक्षा परिस्थितीत आधुनिक युद्धाचे स्वरूप झपाट्याने बदलत असून भारतीय सशस्त्र दलांनीही त्यानुसार स्वतःला सक्षम बनविण्याची गरज आहे. मे २०२५ मध्ये राबविण्यात आलेल्या ऑपरेशन सिंदूरने भारताच्या लष्करी क्षमतेचा, राष्ट्रीय इच्छाशक्तीचा आणि एकात्मिक लष्करी प्रतिसादाचा नवा मापदंड निश्चित केला आहे, असे प्रतिपादन लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी केले.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १५० व्या अभ्यासक्रमाच्या पासिंग आऊट परेडचा शनिवारी आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी भावी लष्करी अधिकाऱ्यांना आधुनिक सुरक्षाविषयक आव्हानांची जाणीव करून देत भविष्यातील नेतृत्वासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

जनरल द्विवेदी म्हणाले की, आजच्या काळातील सुरक्षा आव्हाने पारंपरिक युद्धापुरती मर्यादित राहिलेली नाहीत. शत्रू नेहमी गणवेशात किंवा घोषित रणांगणावरच समोर येतो असे नाही. ग्रे झोन संघर्ष, सायबर हल्ले, माहिती युद्ध आणि संकरित युद्धाच्या नव्या स्वरूपामुळे सुरक्षेची व्याख्या बदलत आहे. अशा परिस्थितीत केवळ शारीरिक ताकद नव्हे तर वेगवान निर्णयक्षमता, दूरदृष्टी आणि तांत्रिक कौशल्य आवश्यक आहे.

ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, या मोहिमेत भारताने राष्ट्रीय सुरक्षेला आव्हान देणाऱ्या घटकांना अचूक, नियोजित आणि ठोस प्रत्युत्तर दिले. राष्ट्रीय इच्छाशक्ती आणि लष्करी सामर्थ्य यांचा प्रभावी संगम या कारवाईत दिसून आला. भारत चिथावणीखोरांना कसा प्रतिसाद देतो, याचा स्पष्ट संदेश या मोहिमेतून जगाला मिळाला असून भविष्यातही हा मापदंड कायम राखण्याची जबाबदारी सशस्त्र दलांवर आहे.

ते म्हणाले की, संरक्षण दलांमधील समन्वय आणि एकात्मिक कार्यपद्धती ही भविष्यातील युद्धनीतीची गरज आहे. ऑपरेशन सिंदूरमधील यश हे तिन्ही दलांमधील समन्वय, परस्पर विश्वास आणि प्रशिक्षणाच्या बळावर मिळाले. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत पहिल्या दिवसापासूनच रुजविण्यात येणारी संयुक्ततेची भावना यासाठी महत्त्वाची ठरते.

भावी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, पुढील काळात ते सैन्य, नौदल किंवा हवाई दलातील कोणत्याही शाखेत सेवा बजावतील, मात्र राष्ट्रसेवेचे ध्येय एकच राहील. एकत्रितपणे काम करण्याची भावना कायम ठेवणे ही काळाची गरज आहे. या प्रसंगी जनरल द्विवेदी यांनी स्वतःच्या प्रशिक्षणकाळातील आठवणींनाही उजाळा दिला. याच प्रबोधिनीच्या परेड मैदानातून ४२ वर्षांपूर्वी आपण अधिकारी म्हणून बाहेर पडलो होतो, असे सांगताना त्यांनी हा क्षण अत्यंत भावनिक आणि वैयक्तिक असल्याचे नमूद केले. तुम्ही आज ज्या प्रवासाला सुरुवात करत आहात, तो आयुष्यभरासाठी तुमची ओळख घडविणारा आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत मिळालेली मूल्ये, शिस्त आणि नेतृत्वगुण संपूर्ण कारकिर्दीत तुमच्यासोबत राहतील, असे त्यांनी कॅडेट्सना संबोधित करताना सांगितले.

परेडमधील शिस्तबद्ध संचलन आणि उत्कृष्ट कवायतीबद्दल त्यांनी सर्व कॅडेट्सचे कौतुक केले. विविध देशांतून आलेले हे कॅडेट्स भिन्न संस्कृती आणि पार्श्वभूमीचे असले तरी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील समान मूल्ये, शिस्त आणि प्रशिक्षण यामुळे त्यांच्यात एकात्मतेची भावना निर्माण झाल्याचे जनरल द्विवेदी यांनी सांगितले.